# ठाणेमहानगरपालिका, ठाणे
महानगरपाालेकाभवन, डॉ.अल्मेडारोड, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे-४००६०२.
दूरध्वनी:२५३३१२१९/२५३३१५९०

**वृत्तविशेष क्र : 100** **दिनांक : 27/03/2025**

# नगर पथ विक्रेता (फेरीवाला) समितीची निवडणूक प्रक्रिया सुरू
## ११ एप्रिल रोजी होणार मतदान आणि मतमोजणी

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नगर पथ विक्रेता (फेरीवाला) समितीवरील आठ प्रतिनिधींच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. बुधवार, २६ मार्च रोजी महापालिका मुख्यालय, प्रभाग समिती कार्यालय तसेच ठाणे महापालिकेच्या वेबसाईटवर प्रभाग समितीनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. शुक्रवार, ११ एप्रिल रोजी स. ११ ते सायं. ५ या वेळेत प्रभाग समिती कार्यालयात मतदान होणार असून मतमोजणी त्याच दिवशी महापालिका मुख्यालयात होणार आहे.

पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) नियम २०१६ नुसार ठाणे महापालिका पथ विक्रेता समितीमधील पथ विक्रेत्यांच्या प्रतिनिधींची नगर पथ विक्रेता समितीचे सदस्य म्हणून नोंदणीकृत पथ विक्रेत्यांमधून ५ वर्षांच्या कालावधीसाठी निवडणूक होणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी प्रबोधन मवाडे यांनी जाहीर केले आहे.

नगर पथ विक्रेता समितीच्या निवडणुकीसाठी १३६५ मतदारांची यादी प्रकाशित करण्यात आली आहे. या सर्व मतदारांनी निवडणुकीत सक्रिय सहभाग घेऊन ही प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव आणि निवडणूक निर्णय अधिकारी प्रबोधन मवाडे यांनी केले आहे.

**आठ जागांसाठी होणार मतदान**
सर्वसाधारण गट (महिला राखीव) - ०३
अनुसूचित जाती (महिला राखीव) - ०१
अनुसूचित जमाती - ०१
इतर मागास वर्ग - ०१
अल्पसंख्याक - ०१
विकलांग व्यक्ती (महिला राखीव) - ०१
एकूण जागा – ०८

**निवडणूक कार्यक्रम**

- बुधवार, २६ मार्च २०२५ रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्दी महापालिका मुख्यालय आणि प्रभाग समिती कार्यालय येथे प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- गुरुवार, २७ आणि शुक्रवार, २८ मार्च, २०२५ रोजी महापालिका मुख्यालय, तळमजला येथे स. ११ ते सायं. ५ या वेळेत नामनिर्देशन पत्रांचे वाटप होईल.
- मंगळवार, ०१ आणि बुधवार, ०२ एप्रिल, २०२५ रोजी महापालिका मुख्यालय येथे स. ११ ते सायं. ५ या वेळेत नामनिर्देशन पत्रे स्वीकारली जातील.
- गुरूवार, ०३ एप्रिल, २०२५ रोजी स. ११ वाजल्यापासून महापालिका मुख्यालय येथे नामनिर्देशन पत्रांची छाननी होईल. त्याच दिवशी छाननी पूर्ण झाल्यावर प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल.
- शुक्रवार, ०४ एप्रिल, २०२५ रोजी स. ११ ते सायं. ५ पर्यंत महापालिका मुख्यालय येथे आक्षेप अर्ज स्वीकारले जातील.
- सोमवार, ०७ एप्रिल, २०२५ रोजी स. ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत महापालिका मुख्यालय येथे आक्षेप अर्जांवर सुनावणी होईल.
- मंगळवार, ०८ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महापालिका मुख्यालय येथे नामनिर्देशन पत्र मागे घेता येईल.
- मंगळवार, ०८ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी ३.०० नंतर महापालिका मुख्यालय येथे उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध होईल.
- शुक्रवार, ११ एप्रिल, २०२५ रोजी स ११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती कार्यालयात मतदान होईल.
- शुक्रवार, ११ एप्रिल, २०२५ रोजी सायं. ५.०० नंतर महापालिका मुख्यालय येथे मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात येईल.

**प्रभाग समितीनिहाय मतदार**

| **प्रभाग समिती** | **पुरुष** | **महिला** | **एकूण** |
|---|---|---|---|
| माजिवडा-मानपाडा - | ८५ | २४ | १०९ |
| वर्तक नगर - | १४३ | ३९ | १८२ |
| लोकमान्य नगर-सावरकर नगर - | १३५ | ३९ | १७४ |
| वागळे - | ९४ | १४ | १०८ |
| नौपाडा - कोपरी - | २७६ | ६५ | ३४१ |
| उथळसर - | १६५ | ७२ | २३७ |
| कळवा - | ६२ | २८ | ९० |
| मुंब्रा - | ७२ | १७ | ८९ |
| दिवा - | ०८ | २७ | ३५ |
| **एकूण -** | **१०४०** | **३२५** | **१३६५** |